# गौरव प्रकाशन

संपादक : बंडूकुमार धवणे

वर्ष १४ ◆ अंक ५० ◆ अमरावती ◆ दि. ११ ते १७ एप्रिल २०२४ ◆ पृष्ठ ४ ◆ किंमत २ ₹ ◆ Email: gauravprakashan1@gmail.com





विनम्र अभिवादन



महात्मा जोतिराव फुले यांची आज जयंती. त्यानिमित्य त्यांच्या पावन स्मृतीस विनम्र अभिवादन !

# ...तर संविधान पूर्ण देशात लागू करण्याची हिंमत का केली नाही?

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इंडिया आघाडीवर केला हल्लाबोल

रामटेक – इंडिया आघाडीतील नेते पूर्ण ताकदीने देशातील जनतेत फूट पाडण्याचा प्रयत्न करतायेत. काँग्रेसनं एक देश, एक संविधान लागू होऊ दिले नाही. संविधानाच्या नावावर खोटं पसरवणाऱ्यांना माझा सवाल आहे. जर संविधानाची काळजी होती मग बाबासाहेब आंबेडकरांचे संविधान पूर्ण भारतात लागू करण्याची हिंमत का केली नाही. ७० टक्के संविधान पूर्ण देशात लागू होऊ दिले नाही. परंतु आम्ही काश्मीर ते कन्याकुमारी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे संविधान लागू केले. काँग्रेसनं कलम ३७० कायम ठेवले, जम्मू काश्मीरचे संविधान वेगळे होते, कलम ३७० हटवल्यानंतर आग लागेल असं काँग्रेस बोलत होती, मग कुठे आग लागली का? बाबासाहेब आंबेडकर जिथे कुठे असतील ते मोदींना आशीर्वाद देतील अशा



शब्दात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इंडिया आघाडीवर हल्लाबोल केला. रामटेकमध्ये महायुतीच्या उमेदवारांचा प्रचार करण्यासाठी पंतप्रधान मोदी आले होते. यावेळी ते म्हणाले की, प्रत्येक निवडणुकीत विरोधक लोकशाही वाचवा असा नारा देतात. आणीबाणीच्या काळात लोकशाही धोक्यात नव्हती का? एका गरीबाचा मुलगा पंतप्रधान झाला म्हणून लोकशाही, संविधान धोक्यात असल्याचं दिसू लागलं. इंडिया आघाडी कधीही गरिबांना पुढे येताना पाहू शकत नाही. या गरीब मुलावर कितीही हल्ला केला मोदी देशातील जनतेच्या सेवेपासून मागे हटणार नाही. इंडिया आघाडीतील नेते पूर्ण ताकदीने देशातील जनतेत फूट पाडण्याचा प्रयत्न करतायेत. जर लोक एकत्र आले तर यांचे राजकारण धोक्यात येईल. त्यामुळे जनतेला आवाहन आहे, एकजूट होऊन देशाच्या नावावर मतदान द्या. इंडिया आघाडी ताकदवान झाली तर देशात फूट पडेल असा घणाघात त्यांनी केला. तसेच इंडिया आघाडीतले समाजात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न करतायेत. रामटेकमध्ये प्रभू रामाचे पाऊल पडले आहे. यावेळी रामनवमीला अयोध्येत रामलल्ला टेंटमध्ये नव्हे तर भव्य मंदिरात दर्शन देतील. ५०० वर्षांनी हा क्षण आला होता. जेव्हा रामलल्लाच्या प्राणप्रतिष्ठेची वेळ आली तेव्हा इंडिया आघाडीतल्या लोकांनी निमंत्रणही नाकारले. सनातनवर हल्ले करतात, सनातन संपवणाऱ्यांसोबत सभा घेत आहेत. हिंदू धर्माच्या शक्तीला संपवण्याचा घाट इंडिया आघाडीचे नेते करतायेत. या आघाडीला महाराष्ट्रात एकही जागा जिंकू देणार का? या निवडणुकीत त्यांच्या पापाची शिक्षा द्या असं आवाहन मोदींनी जनतेला केले. दरम्यान, विकसित भारताच्या संकल्पासाठी मतदान करायचं आहे. टीव्ही, मीडिया सातत्याने सर्व्हे दाखवतायेत, त्यात एनडीएचा बंपर विजय दाखवला पाहिजे. परंतु सर्व्हेला मीडिया इतका खर्च का करते? पैसे वाचण्याचा एक फॉर्म्युला सांगतो, जेव्हा मोदींना शिव्या जास्त पडतील, माझ्या आई वडिलांवर शिव्या देतील, ईव्हीएमवर शंका उपस्थित करतील तेव्हा समजून जा, पुन्हा एकदा असं मोदींनी जनतेला विचारले, तेव्हा लोकांनी मोदी सरकार असा नारा दिला. आज नागपूरमध्ये एम्स, आयआयएम, मेडिकल कॉलेज, मेट्रो, अमरावतीत टेक्सटाईल पार्क बनतंय. बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्गाने या संपूर्ण भागात विकास होतोय. १० वर्षात विकासाची बरीच कामे झालीत.

# टाटा एस मालवाहू गाडीची दुचाकीला जबर धडक





## महिलेचा मृत्यू, २ जण जखमी



चांदूर रेल्वे : गॅस सिलेंडर घेऊन जाणाऱ्या टाटा ऐस मालवाहू गाडीने दुचाकीला दिलेल्या जबर धडकेत एका महिलेचा मृत्यू तर २ जण जखमी झाल्याची घटना चांदूर रेल्वे ते कुऱ्हा मार्गावरील एमआयडीसी जवळ मंगळवारी दुपारी ४ वाजताच्या दरम्यान घडली. शारदा जगन्नाथ भजभुजे (५२ वर्ष) रा. करजगाव, ता. चांदूर बाजार असे दुचाकीवरील मृतक महिलेचे तर मनोज जगन्नाथ भजभुजे (२६ वर्ष) रा. करजगाव, ता. चांदूर बाजार असे जखमी दुचाकी चालकाचे नाव आहे. तर मालवाहू गाडीचा चालक रामकृष्ण गोविंदराव धांदे (३९ वर्ष) रा. तळेगाव ठाकुर हा सुध्दा जखमी झाला आहे. पोलीस सुत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, मंगळवारी जखमी मनोज भजभुजे हा आई शारदा भजभुजे यांना घेऊन दुचाकी क्र. एमएच २७ डिपी ६५६३ ने नातेवाईकाकडे चांदूर वरून आमला (विश्वेश्वर) येथे जात असतांना विरूध्द दिशेने येणाऱ्या टाटा ऐस मालवाहू गाडी क्र. एमएच २७ बीएक्स ७१२८ ने दुचाकीला जबर धडक दिली. या अपघातात शारदा भजभुजे यांचा जागीच मृत्यु झाला. तर दुचाकीचालक मनोज भजभुजे व मालवाहू गाडीचालक रामकृष्ण धांदे हे दोघे जखमी झाले असुन त्यांना अमरावती रेफर करण्यात आले. घटनेची माहिती मिळताच चांदूर रेल्वे पोलीस स्टेशनचे राहुल इंगळे व चालक शेख मुजफ्फर हे घटनास्थळी पोहचले होते, त्यांनी घटनेचा पंचनामा केला.

# भर पावसात महाविकास आघाडीची भव्य रॅली

» बळवंत वानखडे यांच्या पदयात्रेत हजारो नागरिक सहभागी

» गांधी चौक, जवाहर गेट परिसरातील जल्लोषात स्वागत



अमरावती : अमरावती लोकसभा मतदार संघाचे महाविकास आघाडीचे उमेदवार बळवंत वानखडे यांच्या पदयात्रेला मंगळवारी अमरावती करांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. भर पावसात नागरिकांच्या रेकॉर्डब्रेक गर्दी असलेल्या पदयात्रेचे जुन्या शहरातील गांधी चौक, जवाहर गेट, अंबागेट परिसरात या जल्लोषात स्वागत करण्यात आले. परिसरातील महिलांनी बळवंत वानखडे यांचे औक्षण केले तर नागरिकांनी फटाक्यांच्या आतिषबाजीत व फुलांची उधळण करत महाविकास आघाडीच्या विजयी पदयात्रेचे धडाक्यात स्वागत केले. सोमवारी लोकसभा निवडणुकीमधील उमेदवारांना चिन्हाचे वाटप झाल्यानंतर मंगळवार पासून प्रचाराने वेग घेतला आहे.शेतकरी कुटुंबातील सर्वसामान्य व्यक्तिमत्व असलेले बळवंत वानखडे हे महाविकास आघाडीचे उमेदवार असून त्यांना शहर आणि ग्रामीण भागातून मोठ्या प्रमाणात जनसमर्थन मिळत आहे.मंगळवारी सायंकाळी अमरावती शहरात अवकाळी पावसाला सुरुवात झाली असतांना देखील बळवंत वानखडे यांच्या पदयात्रेत हजारो नागरिकांनी लावलेली उपस्थिती बळवंत वानखडे यांचे बळ वाढवणारी ठरली आहे. माजी पालकमंत्री ?ड. आ.यशोमती ठाकूर, माजी पालकमंत्री सुनील देशमुख ,माजी खा. अनंतराव गुढे, सुनील खराटे, धाने पाटील,माजी महापौर विलास इंगोले, भय्या पवार,वैभव देशमुख,रवींद्र इंगोले,महिलाशहराध्यक्ष श्रीमती जयश्री वानखडे, अंजली ठाकरे,माजी आरोग्य सभापती बाळासाहेब हिंगणीकर,शिवसेना नेत्या प्रीती बंड, र्मिलद चीमोटे,प्रदीप बाजड, पराग गुडधे,रामेश्वर अभ्यंकर,काँग्रेसचे शहराध्यक्ष बबलू शेखावत,अर्चना इंगोले, प्रशांत वानखेडे,विजय बेनोडेकर, राजगुरे यांच्या प्रमुख उपस्थितीत बळवंत वानखडे यांच्या प्रचारार्थ मंगळवार ९ एप्रिल रोजी सायंकाळी पाच वाजता पदयात्रा काढण्यात आली. या पदयात्रेमध्ये महाविकास आघाडी मधील सर्वच ग पक्षाचे व संघटनांचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.ज्या मार्गावरून ही पदयात्रा निघाली त्या मार्गावरील नागरिक सुद्धा या पदयात्रेत सामील झाले होते त्यामुळे या पदयात्रेला मोठे स्वरूप प्राप्त झाले होते. गांधी चौक येथून सुरू झालेली पदयात्रा अंबागेट, बुधवारा या परिसरात पोहचली याच दरम्यान सायंकाळी सातच्या सुमारास अचानक पावसाने हजेरी लावली.

भर पावसातही कार्यकर्ते व नागरिकांनी प्रचार सुरूच ठेवला त्यामुळे बळवंत वानखडे यांच्यावर मतदारांचे प्रेम व त्यांच्या प्रति असलेली आस्था यानिमित्ताने समोर आली आहे. आपल्या उमेदवारासाठी कार्यकर्ते स्वयंस्फूर्तीने प्रचार करत असल्याने बळवंत वानखडे यांचा विजय निश्चित असल्याचे अमरावती करांचे म्हणणे आहे.







काय करूं आतां धरूनिया भीड । नि:शंक हे तोंड वाजविले ।।
नव्हे जगीं कोणी । मुकीयांचा जाण सार्थक लाजून नव्हे हित ।।


कोणतीही चळवळ यशस्वी होण्यासाठी तिला वर्तमानपत्राची आवश्यकता असते. ज्या चळवळीचे वर्तमानपत्र नसेल तिची अवस्था पंख तुटलेल्या पक्ष्याप्रमाणे होते. – डॉ. बाबासाहेब आंबेडकर

## खाजगीपणा जपण्याचा हक्क

*खाद्या राजकीय पक्षाच्या चिन्हावर किंवा अगदी कोणतीही राजकीय पार्श्वभूमी नसतानाही, पात्र नागरिक आणि घटनेने दिलेली मान्यता यांच्या बळावर निवडणुकीच्या रिंगणात उतरणाऱ्या कोणाही नागरिकास त्याच्या खासगी जीवनातील काही बाबी नागरिकांच्या, म्हणजे मतदारांच्या माहितीसाठी उघड करणे बंधनकारक असते आणि अशा बाबी जाणून घेणे हा नागरिकांचाही हक्क असतो. या बाबींच्या निकषावरच, कोणत्या उमेदवारास निवडून देऊन प्रतिनिधीगृहात पाठवायचे याचा निर्णय घेणे किंवा सर्व उमेदवारांस स्पष्टपणे नाकारणे मतदारांस शक्य होत असते. त्यामुळे मतदारांस मानसिकदृष्ट्या मानवणारी माहिती प्रतिज्ञापत्राद्वारे उघड करताना उमेदवाराची कसोटी लागत असते. त्यातूनही उमेदवाराने जाहीर केलेली माहिती आणि त्याची प्रत्यक्ष दिसणारी स्थिती यांत तफावत आढळल्यास तोदेखील चर्चेचा विषय ठरून त्याचा थेट किंवा अप्रत्यक्ष परिणाम त्याच्या जनाधारावरही होत असल्याने प्रतिज्ञापत्र हा कोणत्याही उमेदवाराच्या सार्वजनिक जीवनातील खाजगी आयुष्याचा लेखाजोखा मांडणारा महत्वाचा व संवेदनशील दस्तावेज ठरत असतो. अनेकदा खरे उघड करता येत नाही आणि खोटा तपशील देता येत नाही, अशीही स्थिती होत असल्यास खाजगीपणा जपण्याचा हक्क आणि मतदारांचा माहिती जाणून घेण्याचा हक्क यांतील संघर्षात उमेदवाराची स्थिती अवघड व अडचणीचीही होत असल्याचे दिसून येते. निवडणुका पारदर्शक व प्रामाणिकतेने पार पडाव्यात यासाठी निवडणूक आयोगासारख्या नियंत्रणसंस्थांबरोबरच, निवडणुकांतील उचित अनुचित व्यवहारांवर लक्ष ठेवणाऱ्या काही सामाजिक संस्थादेखील यावर कसोशीने नजर ठेवत असतात. उमेदवाराची सांपत्तिक स्थिती, त्याने जाहीर केलेल्या स्वतःच्या किंवा कौटुंबिक मालकाच्या मालमत्ता तसेच कर्जे आदी जबाबदाऱ्यांची माहिती प्रतिज्ञापत्रांद्वारे जाहीर केल्यानंतर काही गब्बर राजकीय किंवा स्वयंसेवी संस्थांकडून त्याचे अधिक विश्लेषण केले जाते. मतदारांना त्याविषयीचे नेमके वास्तव समजावे व निवड करण्यापूर्वी निर्णय घेणे सोपे व्हावे यासाठी अशा विश्लेषणाचे महत्व अलीकडे वाढू लागल्याने, मतदारांच्या जाणून घेण्याच्या हक्काबरोबरच, उमेदवाराच्या खाजगीपणाच्या हक्काचे महत्वदेखील ऐरणीवर येऊ लागले आहे. मात्र, प्रत्येक उमेदवारास त्याचा खाजगीपणा जपण्याचा हक्क असून मतदारांसाठी महत्वाची नसलेली व त्याचा खाजगीपणा जपणारी माहिती प्रतिज्ञापत्राद्वारे उघड करणे गरजेचे नाही, असा महत्वाचा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिल्याने आता उमेदवारांपैकी अनेकांना सुटकेचा निःश्वास टाकणे सोपे होणार आहे. गुवाहाटी उच्च न्यायालयाने एका उमेदवाराच्या मालमत्तेसंबंधातील आव्हान याचिकेवर निर्णय देताना, त्याने स्वतःच्या मालकीची स्कूटर आणि पत्नीच्या मालकीची मारुती ओम्नी चारचाकी यांची माहिती लपविल्याच्या आक्षेपास ग्राह्य धरून त्याची निवड रद्द केली होती. सर्वोच्च न्यायालयात हे प्रकरण गेल्यावर न्यायालयाने हा निर्णय रद्दबातल ठरविला आणि मतदारांवर प्रभाव पडणार नाही अशा बाबींची माहिती देणे गरजेचे नाही, असा स्पष्ट निर्वाळाही दिला. ऐषारामी जीवनशैलीशी संबंचित असलेली माहिती मात्र उमेदवारास दडविता येणार नाही, पण गरजेच्या व सर्वसामान्य जगण्याशी संबंधित असलेल्या प्रत्येक वस्तूची माहिती देणे गरजेचे नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले आहे. उमेदवारासंबंधीची संपूर्ण माहिती जाणून घेण्याचा मतदारांस पूर्ण हक्क असतो, पण त्याच्या जीवनशैलीमुळे भुवया उंचावल्या जातील अशी माहिती वगळता उमेदवाराकडे असलेल्या प्रत्येक वस्तूचा संपूर्ण तपशील जाहीर करण्याची गरज नाही, असा स्पष्ट निर्वाळा सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारच्या एका निकालात दिला आहे. मतदारांच्या जाणून घेण्याच्या हक्कापायी उमेदवाराच्या खाजगीपणा जपण्याच्या हक्काचे उल्लंघन होणे योग्य नाही, या सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाने न्यायाचा तराजू समतोल केल्याचे स्पष्ट झाले आहे. मतदारांनी जाणून घेतलीच पाहिजे एवढी महत्वाची नसलेली कोणतीही खाजगी माहिती प्रतिज्ञापत्राद्वारे जाहीर करण्याची गरज नाही, पण ज्यामुळे मतदारांच्या मानसिकतेवर उमेदवाराच्या सार्वजनिक जीवनातील प्रतिमेचा प्रभाव पडू शकतो, अशी माहिती वगळता येणार नाही असा या निकालाचा स्पष्ट अर्थ आहे.*

# स्त्री शिक्षणाचे प्रणेते - महात्मा फुले

अंधश्रद्धेला कट्टर विरोध करणारे, वैज्ञानिक दृष्टिकोन बाळगणारे, स्त्री शिक्षणाचा पुरस्कार करणारे आद्य प्रणेते महात्मा ज्योतिबा फुले यांची आज जयंती. महात्मा ज्योतिबा फुले म्हणजे एक चालते बोलते विद्यापीठ,संस्कारपीठ होते. त्यांनी भारतीय समाजातील अनिष्ट रूढी-परंपरा समूह नष्ट करण्यासाठी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. ते नेहमी बहुजन समाजाच्या व शेतकऱ्यांच्या समस्यांना केंद्रस्थानी ठेवून आपले कार्य करत होते




महाराष्ट्रामध्ये स्त्री शिक्षणाला यशाच्या शिखरावर पोहोचविण्यात महात्मा फुलेंची महत्त्वाची भूमिका राहिलेली आहे. स्त्री शिक्षणाचे मूर्तमेढ रोवणारा आद्य क्रांतिकारक म्हणजे महात्मा ज्योतिबा फुले होय. त्यांनी भारतातील मुलींची पहिली शाळा १८४८ साली पुणे येथे भिडे यांच्या वाड्यात काढली. ते उत्कृष्ट मराठी लेखक, विचारवंत व समाज सुधारक होते. त्यांनी आपल्या पुरोगामी विचारांची निर्भीडपणे मांडणी केली स्वत:चे विचार आचरणात आणून समाजालाही त्याचा काही उपयोग व्हावा या दृष्टीने त्यांनी समाज सुधारण्यासाठी अतोनात प्रयत्न केले .

१८७३ साली महात्मा फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. आणि त्याकाळी पुरोहितांकडून होणाऱ्या अन्याय अत्याचारापासून समाजाची सुटका करण्यासाठी त्यांनी सत्यशोधक समाजाचे काही नियम बनविले समाजातील तळागाळातील व्यक्तींना आपल्या हक्काची जाणीव करून दिली. सत्यशोधक समाजाने गुलामगिरी विरुद्ध आवाज उठवला. सत्यशोधक समाजाने पुरोहितांशिवाय विवाह लावण्यास सुरुवात केली. मराठीमध्ये मंगलाष्टके रचल्या गेली. समाजातील विषमता नष्ट करणे, तळागाळातील समाजापर्यंत हक्काचे शिक्षण पोहोचविणे हे सत्यशोधक समाजाचे ध्येय होते. शिक्षणाशिवाय तरनोपाय नाही हे महात्मा फुलेंनी ओळखले होते. म्हणून त्यांचा स्त्री शिक्षणावर जास्त भर असायचा.शिक्षणाचे महत्त्व पटवून देण्यासाठी त्यांनी काही कविता रचल्या. महात्मा फुले म्हणायचे

***विद्ये विनामती गेली !***
***मतीविना नीती गेली !***
***नितीविना गती गेली !!***
***गतीविना वित्त गेले !***
***वित्तविना शूद्र खचले !***
***इतके अनर्थ एका अविद्येने केले !!***

ज्योतिरावांनी आपल्या पत्नी सावित्रीबाई फुले यांना शिक्षण देऊन प्रथम स्त्री शिक्षणाचे मुहूर्तमेढ रोवली. सर्वप्रथम आपल्या पत्नीला त्यांनी शिक्षण घेण्यासाठी प्रवृत्त केले. आणि म्हणूनच सावित्रीबाई फुले या भारतातील पहिल्या महिला शिक्षिका म्हणून प्रसिद्ध झाल्या. पुढे सावित्रीबाई फुले यांनी सुद्धा आपल्या पतीच्या खांद्याला खांदा लावून स्त्री शिक्षणाच्या या चळवळीमध्ये स्वतःला झोकून दिले. व स्त्री शिक्षणाची गंगा झपाट्याने वाहण्यास सुरुवात झाली महात्मा फुले यांना वाचनाची फार आवड होती. ते छत्रपती शिवाजी महाराजांचे चरित्र, शिवाजी महाराजांनी केलेले कार्य वाचून प्रेरित झाले. शिवाजी महाराजांनी ज्याप्रमाणे समाजातील उपेक्षितांसाठी कार्य केले. त्याचप्रमाणे बहुजन समाजाचे अज्ञान ,दारिद्र्य आणि समाजातील जातिभेद पाहून महात्मा फुले यांना अतिशय अस्वस्थ वाटत असे. सामाजिक परिस्थिती सुधारावी असा त्यांनी निश्चय केला. व बुधवार पेठेतील भिडे यांच्या वाड्यातील पहिली मुलींची शाळा हेच त्यांच्या कार्याचे केंद्र बनले. १८५२ मध्ये त्यांनी अस्पृश्य मुलांच्या शिक्षणासाठी सुद्धा एक शाळा स्थापन केली. त्यांच्या या शाळेला सनातन्यांकडून नेहमी विरोध होत होता.पण ज्योतिराव आपल्या भूमिकेवर ठाम होते. ते म्हणायचे कोणताही धर्म हा ईश्वराने निर्माण केला नाही आणि जातिभेद ही निर्मिती मानवाचीच आहे


मानवाने गुण्या गोविंदाने राहावे असे त्यांचे मत होते. त्याकाळी शेतकऱ्यांवर इंग्रजांकडून शेत सारा भरण्यासाठी दबाव आणला जायचा. पण ज्योतीरावांनी याच अन्यायाला वाचा फोडण्यासाठी शेतकऱ्याचा आसूड या आपल्या पुस्तकातून संपूर्ण शेतकऱ्याची विधारक परिस्थिती व वास्तवता समाजासमोर आणली. या पुस्तकांमध्ये त्यांनी आपला विशाल असा दृष्टिकोन मांडला. महात्मा ज्योतिबा फुले हे वैज्ञानिक दृष्टिकोन असणारे, तत्त्वचिंतक असे व्यक्तिमत्व म्हणून जगासमोर आले. सार्वजनिक सत्यधर्म हा सत्यशोधक समाजाचा प्रमाण ग्रंथ त्यांनी समाजासमोर आणला. दीनबंधू नावाचे साप्ताहिक चालविले. या साप्ताहिकातूनही त्यांनी त्याकाळी असलेल्या विदारक परिस्थितीचे वर्णन व त्यासाठी करण्यात येणाऱ्या उपायोजना आपल्या या साप्ताहिकातून समाजापुढे मांडल्या. त्यातून समाज जागृती होऊ लागली. त्यांनी आपला गुलामगिरी नावाचा ग्रंथ अमेरिकेतील कृष्णवर्णीय लोकांना समर्पित केला. महात्मा ज्योतिबा फुले फक्त भारतीय समाजामध्ये नावारूपास आले नाही तर विदेशी लोकांच्या हृदयात सुद्धा त्यांनी आपले स्थान मिळविले. अशा या महान समाजसुधारकाची आज जयंती!!!! त्यांच्या पावन स्मृतीस विनम्र अभिवादन!!!!!



**-अविनाश अशोक गंजीवाल**
**(स. शि.)**
**जि प प्राथमिक शाळा करजगाव,**
**पं स तिवसा जि अमरावती**

# जिल्ह्यातील ११ तालुक्यात गारपीट, वादळासह अवकाळी फटका

अमरावती : जिल्ह्यात मंगळवारी रात्री अमरावती, भातकुली. मोर्शी, अचलपुर, चांदुरबाजार, चिखलदरा, धारणी, अंजनगाव सुर्जी, दर्यापुर, धामणगाव रेल्वे, चांदूर रेल्वे या ११ तालुक्यात काही भागात गारपीट,तसेच वादळासह अवकाळी फटका बसला. यामध्ये ५२३ गावातील ३५ हजार ३८९ हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले असून १७६ गावातील १४९८ घरांची पडझड झाली आहे.याशिवाय लहाण मोठे १२ जनावरे दगावल्याचा प्राथमिक अहवाल प्रशासनाकडुन शासनाकडे पाठविण्यात आला आहे.तसेच चांदूरबाजार तालुक्यातील बेघर झालेल्या ८५ कुटुबांतील २२५ नागरीकांना सुरक्षित स्थळी हलविण्यात आले आहे. मंगळवारी सायंकाळी ६ वाजतानंतर वादळी पावसाने जिल्ह्यात थैमान





घातले.यामध्ये अमरावती, भातकुली. मोर्शी, अचलपुर, चांदुरबाजार, चिखलदरा, धारणी, अंजनगाव सुर्जी, दर्यापुर, धामणगाव रेल्वे, चांदूर रेल्वे या ११ तालुक्यांना चांगलाच फटका बसला आहे.जिल्ह्यात ९.९ मिमि पावसाची नोद असली तरी वादळी पावसामुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.चांदूरबाजार तालुक्यातील क्षतिग्रस्त झालेल्या ८५ कुटुबांतील २२५ सदस्यांना तातडीने सुरक्षित स्थळी हलविण्यात आले. मोर्शी, अचलपुर, भातकुली, चांदूरबाजार तालुक्यातील सात गावांत १२ जनावरे दगाविली आहे.तसेच नऊ तालुक्यातील १७६ गावांमध्ये १४०९ घरांची अंशता तसेच १४ घरे जमिनदोस्त झाली आहे. याशिवाय ५ गोठे व ७० झोपड्यांचे नुकसान झाले आहे. पिकांना देखील याचा मोठा फटका बसला.९ तालुक्यातील ५२३ गावांमध्ये ३५ हजार ३८९ हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले आहे.यामध्ये गहू, ज्वारी, तीळ, भाजीपाला, संत्रा, कांदा, आंबा, केळी, लिंबू, मूंग, पपई आदी पिके बाधित झाली आहे. याचा प्राथमिक अहवाल प्रशासनाकडुन तयार करण्यात आला आहे. शिरखेड परिसरात मध्यरात्री झालेल्या वादळी वारे अवकाळी पाऊस मोर्शी तालुक्यातील शेतकरूयांचे कंबरडे मोडले आहे. रब्बीसह इतर पीके व फळबागांची मोठे नुकसान झाले आहे. शिरखेड परिसरात मंगळवार ९ एप्रिल रोजी रात्री ७ वाजेच्या सुमारास अचानकपणे झालेल्या वादळी वारूयाने शेतकरूयांचे शिरखेड , लेहेगाव , लाडकी, काटपुर , वाघोली , सावरखेड , लिहीदा , निंभी , नेर पिं. यासह इतर गावातील रब्बी हंगामाचे मोठे नुकसान झाले.

# काँग्रेस हा लबाड लोकांचा पक्ष: उपमुख्यमंत्री फडणवीस



गडचिरोली: मोदी पुन्हा पंतप्रधान झाले तर ते संविधान बदलतील असा प्रचार काँग्रेसचे लोक करीत आहेत. मात्र, काँग्रेस हा लबाड लोकांचा पक्ष असून, त्यांनी ७० वर्षे जम्मू काश्मिरमध्ये संविधान लागू केले नाही, अशी टीका उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. गडचिरोली-चिमूर लोकसभा क्षेत्राचे महायुतीचे उमेदवार अशोक नेते यांच्या प्रचारार्थ आज (दि.११) आलापल्ली येथे जाहीर सभा आयोजित करण्यात आली. त्यात देवेंद्र फडणवीस यांनी काँग्रेसवर घणाघाती टीका केली. संविधानामुळेच चहा विकणारा माणूस पंतप्रधान होऊ शकला, असे खुद्द मोदी म्हणाले. पंतप्रधान होताच त्यांनी सर्वप्रथम संविधानाला वंदन केले. त्यामुळे संविधान बदलण्याचा प्रश्नच येत नाही, असे फडणवीस म्हणाले. यावेळी त्यांनी केंद्र सरकारने संपूर्ण देश आणि गडचिरोली जिल्ह्यातील नागरिकांसाठी राबविलेल्या विविध योजनांचीही माहिती दिली.

याप्रसंगी मंत्री धर्मरावबाबा आत्राम यांनी विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांच्यावर टीका केली. सुधीर मुनगंटीवार हे मंत्री असताना त्यांनी चंद्रपूर जिल्ह्यात दारुबंदी केली होती. परंतु वडेट्टीवार मंत्री होताच त्यांनी चंद्रपूर जिल्ह्यातील दारुबंदी उठवली. त्यामुळे आता चंद्रपुरातून गडचिरोली जिल्ह्यात दारुचा महापूर वाहत आहे, असे आत्राम म्हणाले. या सभेला अशोक नेते, माजी मंत्री अम्ब्रिशराव आत्राम, भाजपचे जिल्हाध्यक्ष प्रशांत वाघरे, बाबूराव कोहळे, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष भाग्यश्री आत्राम, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष रवींद्र वासेकर यांच्यासह अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

# १२ राज्यांमध्ये पावसाचा इशारा


नवी दिल्ली: अवघा देश उष्णतेच्या लाटेने हैराण झाला असताना भारतातील अनेक भागात पावसाचा इशारा देण्यात आला आहे. हवामान विभागाने पुढील दोन दिवसांत महाराष्ट्रासह १२ राज्यांमध्ये पावसाचा अंदाज व्यक्त केला आहे

# तुम्ही माझ्या आणि वंचितच्या नादी लागू नका

## प्रकाश आंबेडकरांचा विजय वडेट्टीवारांना इशारा



मुंबई : महाविकास आघाडीचे नेते गेल्या अनेक महिन्यांपासून प्रकाश आंबेडकर यांच्या वंचित बहुजन आघाडीला मविआत सहभागी करून घेण्याचा प्रयत्न करत होते. मविआने वंचितला महाराष्ट्रात लोकसभेच्या पाच जागा देण्याचा प्रस्ताव दिला होता. मात्र वंचितने तो प्रस्ताव नाकारत 'एकला चलो रे'चा नारा दिला आहे. वंचितने आतापर्यंत महाराष्ट्रातील २० हून अधिक मतदारसंघांमध्ये त्यांचे उमेदवार जाहीर केले आहेत. वंचित बहुजन आघाडीने स्वतंत्रपणे निवडणूक लढण्याचा निर्णय घेतल्याने विधानसभेचे विरोधी पक्षनेते आणि महाराष्ट्र काँग्रेसचे वरिष्ठ नेते विजय वडेट्टीवार यांनी खोचक भाषेत वंचितवर टीका केली आहे. वडेट्टीवार म्हणाले, पहिल्यापासून काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडीत चर्चा चालू होती. म्हणजे साखरपुड्यापासून चर्चा सुरू झाली होती. परंतु, आवश्यक हुंड्याची मागणी पूर्ण न झाल्याने लग्न मोडलं असावं.विजय वडेट्टीवार यांच्या या टीकेला प्रकाश आंबेडकर यांनी जशास तसं उत्तर दिलं आहे. प्रकाश आंबेडकर यांनी काही वेळापूर्वी अकोल्यात प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी प्रकाश आंबेडकरांच्या वक्तव्यावर प्रतिक्रिया दिली. आंबेडकर म्हणाले, निवडणुकीआधी युत्या आणि आघाड्यांमध्ये जागावाटप केलं जातं. महाविकास आघाडीत कालपर्यंत जागावाटप झालंच नव्हतं. त्यामुळे त्यांनी (विजय वडेट्टीवार) हुंड्याची चर्चा करू नये. आम्ही काही गोष्टी बाहेर काढायला गेलो तर इतर काहींना जसं समाजात फिरणं अवघड झालं तसंच होईल. तुम्ही माझ्या आणि वंचितच्या नादी लागू नका. आम्ही कपडे फाडण्यात एक्सपर्ट आहोत.विजय वडेट्टीवार म्हणाले, महाविकास आघाडीशी अखेरपर्यंत चर्चा करीत राहू असे ॲड. प्रकाश आंबेडकर सांगत राहिले, त्याचबरोबर महाविकास आघाडीत भांडणं आहेत, ती त्यांनी आधी सोडावावी मग त्यांच्याशी चर्चा करण्याचा आग्रह आंबेडकरांनी केला होता. प्रकाश आंबेडकर यांनी महाविकास आघाडीत जागावाटपाची चर्चा चालू असतानाच निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातील उमेदवारांच्या नावाची घोषणा केली.



# डोळ्यात मिरचीपूड टाकून लूट टोळी अटकेत; ५ गुन्ह्यांची कबुली

अमरावती : डोळ्यात मिरची पूड टाकून लुटमार करणारी चार जणांची टोळी ग्रामीण पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेने जेरबंद केली. १० एप्रिल रोजी ही कारवाई करण्यात आली. अटक आरोपींकडून तीन दुचाकी आणि चार मोबाइल जप्त करण्यात आले. त्यांच्या अटकेमुळे मंगरूळ दस्तगिर, वर्धा जिल्हयातील तळेगाव शामजीपंत, यवतमाळातील आर्णी येथील प्रत्येकी एक व बाभूळगाव ठाण्यातील दोन असे एकूण पाच गुन्हे उघड झाले. शुभम गोपाळे (२४ वर्ष), रितीक गोपाळे (२३, दोन्ही रा. गोकुळसरा), सागर पधारे (२३, रा. बोरगाव निस्ताने) व मंगेश ठाकरे (२८ वर्षे, रा. पेठ रघुनाथपूर) अशी अटकआरोपींची नावे आहेत. चौघेही धामणगाव रेल्वे तालुक्यातील आहेत. निंबोरा बोडका येथील शेषराव डोंगरे हे ५ एप्रिल रोजी मंगरूळ दस्तगीर येथून निंबोराकडे जात असताना आरोपींनी ट्रिपल सीट येत त्यांच्या मोपेडला धक्का देऊन खाली पाडले. त्यांच्या डोळ्यात मिरची पूड टाकून चाकूचा धाक दाखवत ६० हजार रुपये जबरीने हिसकावून नेले. त्याप्रकरणी मंगरूळ दस्तगीर पोलिसांनी गुन्हा दाखल केला होता, पोलिस अधीक्षक विशाल आनंद यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखाप्रमुख किरण वानखडे यांच्या नेतृत्वात उपनिरिक्षकद्वय सागर हटवार व नितीन चुलपार, मूलचंद भांबूरकर, अमोल देशमुख, मंगेश लकडे, चंद्रशेखर खंडारे आदींनी ही कारवाई केली. उपनिरीक्षक हटवार यांच्या पथकाला शुभम गोपाळेच्या हालचाली संशयास्पद असून तो सध्या त्याच्या साथीदारासह विटाळा येथे असल्याची माहिती मिळाली. त्याआधारे गोपाळेसह अन्य तिघांना ताब्यात घेण्यात आले. त्यांनी लुटमार व मोटारसायकल चोरीचे गुन्हे केल्याची कबुली दिली. लुटमार करण्यासाठी प्रथम त्यांनी बाभूळगाव हद्दीतून दोन मोटारसायकल चोरल्या, त्यांनी ४ एप्रिल रोजी तळेगाव शामजीपंत हद्दीत फायनान्सच्या कर्मचाऱ्याच्या डोळ्यात मिरची पूड टाकून त्याला दीड लाखांनी लुटले. दुसऱ्या दिवशी मंगरूळ दस्तगीर हद्दीत शेषराव डोंगरे यांना लुटले.









गौरव प्रकाशन वृत्तपत्र मालक, प्रकाशक, संपादक - बंडूकुमार श्रीरामजी धवणे यांनी मुद्रक गौरव बं. धवणे यांच्या अनुश्री ग्राफीक्स, चपराशीपुरा अमरावती येथे मुद्रीत करून गजानन नगर नं. १, नवीन बायपास रोड, अमरावती अमरावती-६,येथे प्रकाशित केले. मो. ९९६०२२५२७५ या पत्रातील मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (कोणताही वाद अमरावती न्याय कक्षेत) Email: gauravprakashan1@gmail.com., Website : www.[illegible] (HARD COPY-B/W, PDF-COLOUR)